# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

# घोषणा

आयोगामार्फत **संचालक, आरोग्य सेवा, गट-अ (जाहिरात क्रमांक ०६/२०१६ )** या पदाची जाहिरात दिनांक १७ फेब्रुवारी, २०१६ रोजी देण्यात आली होती व अर्ज स्विकारण्याचा अंतिम दिनांक ८ मार्च, २०१६ असा होता. प्रस्तुत पदाच्या जाहिरातीमध्ये शासन सेवेतील कर्मचा-यांसाठी उच्चतम वयोमर्यादा ५८ वर्षे एवढी ठेवण्यात आली होती. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दिनांक ३ सप्टेंबर, २०१५ च्या शासन निर्णयानुसार आरोग्य सेवा संचालनालयातील गट-अ दर्जाच्या अधिका-यांचे सेवानिवृत्तीचे वय ५८ वर्षावरून ६० वर्षे करण्यात आल्याने प्रस्तुत पदासाठी उच्चतम वयोमर्यादा ६० वर्षे करण्याबाबतचे अभिप्राय शासनाकडून दिनांक १५ मार्च, २०१६ रोजीच्या पत्राद्वारे आयोगास प्राप्त झाले आहेत. त्यानुसार **प्रस्तुत पदाच्या यापूर्वीच्या ५८ वर्षे वयोमर्यादेच्या तरतुदीनुसार शासन सेवेतील ५८ वर्षापेक्षा जास्त वय असलेले गट-अ दर्जाचे वैद्यकीय अधिकारी अर्ज करु शकले नाहीत अशा उमेदवारांसाठीच प्रस्तुत पदाचा ऑन लाईन प्रणालीद्वारे अर्ज सादर करण्यासाठी दिनांक २८ मार्च, २०१६ पर्यत १० दिवसाची मुदतवाढ देण्यात येत असून अन्य उमेदवारांच्या अर्जाचा विचार केला जाणार नाही** याची संबंधित उमेदवारांनी नोंद घ्यावी.

२. विहित पध्दतीने अर्ज सादर करुन ऑनलाईन शुल्क भरण्याची, तसेच स्टेट बँकेमध्ये परीक्षा शुल्क भरण्याकरिता चलनाची प्रत घेण्याची कार्यवाही दिनांक २८ मार्च, २०१६ रोजी २३.५९ वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.

३. चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये दिनांक २९ मार्च, २०१६ पर्यंत बॅकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे बंधनकारक आहे. विहित दिनांकानंतर परीक्षा शुल्क भरल्यास वैध मानले जाणार नाही, तसेच परीक्षा शुल्काचा परतावाही केला जाणार नाही..

**प्रदिपकुमार य. भुर्के**
अवर सचिव,
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

ठिकाण : मुंबई
दिनांक : १९ मार्च, २०१६